



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०६६ ● पुणे ● रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



स्विगीकडून ‘स्विगी सर्व्हज’चे अनावरण 3



सिंहगड रस्त्यावर चंदन चोरी करणारा गजाआड 4

## ठळक बातम्या

### १५ फेब्रुवारीपासून सरकारी खरेदी बंद

मुंबई : (आरंभ पर्व) : आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपणार असले तरी १५ फेब्रुवारीनंतर कोणतीही सरकारी खरेदी करता येणर नाही. तसा आदेशच सरकारने दिला आहे. त्यामुळे सरकारी तिजोरीला १५ फेब्रुवारीला कुलूप लावले जाणार आहे. सरकारने यापूर्वीच सर्व विभागांना त्या त्या उपलब्ध निधीचे योग्य प्रकारे नियोजन करून त्या त्या महिन्यात खर्च करावा, असे आदेश दिले आहेत. मात्र, शेवटच्या तीन महिन्यातच सर्वाधिक खर्च होतो, त्यामुळे त्यावर नंतर अनेक प्रकारच्या तक्रारी येतात. या पार्श्वभूमीवर अनावश्यक खर्चाला आळा घालण्यासाठी आणि प्राधान्य क्रमावर योग्य प्रकारे खर्च होण्यास सरकारने ही प्रणाली राबविण्याबाबत आदेश दिले. अनावश्यक खर्च टाळण्यासाठी विशेषतः फर्निचर दुरुस्ती, झेरॉक्स मशिन तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेणे किंवा त्यांचे सुटे भाग घेणे, त्यांची दुरुस्ती करणे, विविध प्रकारच्या कार्यशाळा घेणे, चर्चासत्र घेणे, भाड्याने कार्यालये घेणे अशा प्रकारच्या कोणत्याही प्रस्तावाला १५ फेब्रुवारीनंतर मंजुरी देऊ नये आणि तसे प्रस्ताव दिल्यास ते मान्यतेसाठी सादर करू नयेत, असे स्पष्ट आदेश सरकारने दिले आहेत. मात्र, औषधांची खरेदी करता येणार आहे. तसेच केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीत राज्याचा हिस्सा याला हे आदेश लागू नाहीत. १५ फेब्रुवारीनंतर पूर्वी निविदा प्रसिद्ध झालेल्या प्रकरणाची खरेदी करता येईल, असेही या आदेशात म्हटले आहे.

### जनरेटरच्या आडून दारू तस्करी

धुळे : (आरंभ पर्व ): दमन मधून बनावट दारूची तस्करी होत असल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने हाणून पाडला. विशेष म्हणजे दारू तस्करांनी जनरेटरमध्ये लपवून तस्करी करण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस आले. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य दारू तस्कराच्या शोधासाठी आता पोलीस सक्रिय झाले आहेत. धुळ्याच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक श्रीराम पवार यांना दीव दमण येथून दारूची मोठ्या प्रमाणे तस्करी होणार असून एका गाडीमध्ये ठेवलेल्या जनरेटरच्या आडून ही तस्करी होत असल्याची गुप्त माहिती त्यांना मिळाली होती. त्यामुळे त्यांनी पोलीस पथकाला तातडीने या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश करून महामार्गावर सापळा लावला. त्यानुसार पथकाने सुरत बायपास रोडवरील खान्देश कॅन्सर सेंटर समोरील महामार्गावर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करीत असताना संबंधित वाहनातील चालक विकाससिंग नगेंद्रसिंग चौहान (रा. धर्मेशभाईकी चाळ, दमण) याच्याकडे विचारपुस केली असता, त्याने पॉवर जनरेटर गुजरात राज्यात घेवून जात असल्याचे सांगून दिशाभूल करणारी माहिती दिली. मात्र बारकाईने जनरेटरची तपासणी केली असता आतील पोकळ भागात विविध कंपनीची विदेशी दारु व बिअर बाटल्या मिळून आल्या. यात एकुण 4 लाख 17 हजार किंमतीची विदेशी दारु आणि 12 लाख किंमतीचे वाहन जप्त करण्यात आले.

# पुणे आणि बीडवर ‘दादागिरी’

## धनंजय मुंडेंना मोठा धक्का, पुणे आणि बीडचे पालकमंत्री पद अजितदादांकडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली असून, उपमुख्यमंत्री अजित पवार हे आता दोन जिल्ह्यांचे पालकमंत्री असणार आहेत. अजित पवार हे पुणे आणि बीडचे पालकमंत्री असणार आहेत. तर मंत्री धनंजय मुंडेंना यादीतून वगळण्यात आलं आहे. धनंजय मुंडे यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे यांच्याकडे बीडचं पालकमंत्रिपद होतं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गडचिरोलीचे पालकमंत्री असणार आहेत. तर उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे आणि बीडचे पालकमंत्री असणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाण्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. पंकजा मुंडे यांच्याकडे जालन्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. गुलाबराव पाटील हे जळगावचे पालकमंत्री असणार आहेत. धुळ्याचं पालकमंत्रिपद जयकुमार रावल यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे. वाशिमची जबाबदारी हसन मुश्रीफ यांना देण्यात आली आहे. संजय राठोड हे यवतमाळचे पालकमंत्री असणार आहेत. उदय सामंत हे रत्नागिरीचे पालकमंत्री असणार आहेत. राज्यात सध्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. या मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडलं आहे. अशा परिस्थितीमध्ये धनंजय मुंडे यांना पालकमंत्रिपद मिळणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं मात्र त्यांचं नाव या यादीमधून वगळण्यात आलं आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री होते. मात्र धनंजय मुंडे यांना बीडचं पालकमंत्रिपद देऊ नये अशी मागणी करण्यात येत होती. अखेर बीडचं पालकमंत्रिपद हे राष्ट्रवादीकडेच राहिलं आहे, मात्र धनंजय मुंडे यांना डच्चू मिळाला असून, बीडचे नवे पालकमंत्री हे आता अजित पवार असणार आहेत. बीड सोबतच अजित पवार यांच्याकडे पुण्याचं देखील पालकमंत्रिपद असणार आहे. तर एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाण्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. आदिती तटकरे या रायगडच्या पालकमंत्री असणार आहेत.



### मंत्रीपदी असताना मुंडेंच्या पतीकडं आर्थिक लाभाचे पद कसं?

**अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडेंच्या पती या लाभाच्या पदावर असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलाय. मुलाखतीत अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. धनंजय मुंडे यांच्या पती राजश्री या व्यंकटेश्वरा इंडस्ट्रिज या कंपनीच्या संचालकपदी असल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे.**

### कोणाकडे कोणत्या जिल्ह्याची जबाबदारी

- गडचिरोली - देवेंद्र फडणवीस
- ठाणे, मुंबई शहर - एकनाथ शिंदे
- पुणे, बीड - अजित पवार
- नागपूर, अमरावती - चंद्रशेखर बावनकुळे
- अहिल्यानगर - राधाकृष्ण विखे पाटील
- वाशिम - हसन मुश्रीफ
- सांगली - चंद्रकांतदादा पाटील
- नाशिक - गिरीश महाजन
- पालघर - गणेश नाईक
- जळगाव - गुलाबराव पाटील
- यवतमाळ - संजय राठोड
- मुंबई उपनगर - आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा
- रत्नागिरी - उदय सामंत
- धुळे - जयकुमार रावल
- जालना - पंकजा मुंडे
- नांदेड - अतुल सावे
- चंद्रपूर - अशोक उईके
- सातारा - शंभूराज देसाई
- रायगड - आदिती तटकरे
- लातूर - शिवेंद्रसिंह भोसले
- नंदुरबार - माणिकराव कोकाटे
- सोलापूर - जयकुमार गोरे
- हिंगोली - नरहरी झिरवाळ
- भंडारा - संजय सावकारे
- छत्रपती संभाजीनगर - संजय शिरसाट
- धाराशिव - प्रताप सरनाईक
- बुलढाणा - मकरंद जाधव पाटील
- सिंधुदुर्ग - नितेश राणे
- अकोला - आकाश फुंडकर
- गोंदिया - बाबासाहेब पाटील
- कोल्हापूर - प्रकाश आबिटकर आणि सहपालकमंत्री माधुरी मिसाळ
- गडचिरोली - आशिष जयस्वाल सहपालकमंत्री
- वर्धा - पंकज भोयर
- परभणी - मेघना साकोरे बोर्डीकर

### सद्यस्थितीत मला कोणतेही...

**दादांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारले, याचा मला आनंद वाटतो. सद्यस्थितीत मला कोणत्याच जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी नको, अशी माझी विनंतीही मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच एकनाथ शिंदे यांचे आभार! मला दिलेल्या विभागाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील, असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.**








# नेम मशाल आणि तुतारीवर...

देश भाजपाचे अधिवेशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत शिर्डी येथे नुकतेच पार पडले. विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला धुवांधार यश मिळाले. राज्यात भाजपाने १४९ मतदारसंघांत निवडणूक लढवली आणि मतदारांनी १३२ उमेदवार विजयी करून विधानसभेत पाठवले. महायुतीचे २८८ पैकी २३५ जागांवर आमदार विजयी झाले. काँग्रेस, उबाठा सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या महाआघाडीला पन्नास जागाही मिळाल्या नाहीत. आमदारांची किमान संख्या नसल्याने विधानसभेत विरोधी पक्ष नेताही महाआघाडीला मिळू शकत नाही.

विधानसभेत मिळालेल्या अभूतपूर्व जनादेशानंतर प्रदेश भाजपाचे साईनगरीत वाजत-गाजत अधिवेशन संपन्न झाले. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, पक्षाचे राज्यातील मंत्रीगण, माजी केंद्रीयमंत्री खासदार नारायण राणे, तसेच पीयूष गोयल, मुरलीधर मोहळ, राहुल नार्वेकर, प्रा. राम शिंदे, रावसाहेब दानवे, नितेश राणे आदी दिग्गजांसह वीस हजार सक्रिय कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपाचे शिर्डीचे अधिवेशन म्हणजे प्रत्येक कार्यकर्त्यांच्या रोमारामांत उत्साह व जोश होता. भाजपाचे स्फूर्तिस्थान आणि देशाचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक केली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत भाजपाने अभूतपूर्व विजय संपादन करून पुन्हा सत्ता काबीज केली आणि आता एकच लक्ष्य म्हणजे राज्यातील महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांवर भाजपाचे कमळ फुलवायचे आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, नागपूरसह सर्व २९ महापालिकांवर शतप्रतिशत विजय संपादन करण्याचा संकल्प शिर्डी अधिवेशनात करण्यात आला. राज्यभर सर्वत्र भगवा फडकविण्याचा अजेंडा घेऊनच भाजपाचे कार्यकर्ते आपल्या मुक्कामी रवाना झाले.

साईनगरीतील भाजपाच्या अधिवेशनात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्षाच्या केडरला ऊर्जा देण्यात आली तसे राज्यातील प्रमुख राजकीय शत्रू असलेल्या शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर तेवढ्याच ताकदीने हल्ला चढविण्यात आला. अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी तर तुतारी व मशाल चिन्ह असलेल्या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाचे अक्षरश: वस्त्रहरण केले. त्यांच्या कावेबाज राजकारणीची चिरफाड केली. एकाला दगाबाज तर दुसऱ्याला गद्दार ठरवले. विधानसभा निवडणुकीत जसे त्यांचे राजकारण गाडले तसे आता महापालिका-जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांना धडा शिकविण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शहा-फडणवीसांनी केले. अमित शहा यांनी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्या राजकारणाला दगाबाज व विश्वासघातकी संबोधल्यामुळेच अधिवेशन तापले आणि गाजले असे म्हणावे लागेल.

पंचायत ते पार्लमेंट आणि शतप्रतिशत हे भाजपाच्या विस्ताराचे परवलीचे शब्द आहेत. कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी हे दोन्ही शब्द यापूर्वी अनेकदा उच्चारले गेले आहेत. राज्य विधानसभा निडणुकीच्या देदीप्यमान विजयानंतर आता स्थानिक स्वराज संस्थांवर शंभर टक्के कमळ फुलविण्यासाठी शतप्रतिशतचा नारा देण्यात आला आहे. (१) २३ नोव्हेंबर २०२४ महाराष्ट्र भाजपाच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस म्हणून नोंद राहील. भाजपाने १४९ जागा लढवल्या व जनतेने १३२ आमदार जिंकून दिले. (२) १९७८ पासून शरद पवारांनी चालवलेले दगाबाजीचे राजकारण या निवडणुकीत जनतेने वीस फूट जमिनीत गाडले. (३) २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी द्रोह केला, बाळासाहेबांच्या सिद्धांताशी तडजोड केली, फसवणूक व लबाडी करून मुख्यमंत्री झाले म्हणून जनतेनेच त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. (४) भाजपाला राज्यात जनतेने प्रचंड बहुमताने सत्ता दिली व फडणवीस हे स्थिर सरकार देतील. (५) स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत विरोधकांना एकही जागा मिळवून देऊ नका. (६) इतके समर्थ ताकदवान व्हा की दगाबाजी करण्याची कोणाची हिम्मत होणार नाही. – इति अमित शहा...

अमित शहा बोलल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि उबाठा सेनेच्या नेतृत्वाला मिरच्या झोंबणे स्वाभाविक होते. शरद पवार हे स्वत: कधी वैयक्तिक टीका टिप्पणी करीत नाहीत पण त्यांना दगलबाज म्हटल्याने त्यांनीही तेवढ्याच वेगाने पलटवार केला. १९७८ मध्ये शरद पवारांनी वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडून पुलोद सरकार महाराष्ट्रात स्थापन केले होते. तेव्हा वसंतदादांच्या पाठीत पवारांनी खंजीर खुपसला अशी टीका झाली होती. पण वसंतदादा पाटील-नाशिकराव तिरपुडे वादात अस्थिर सरकार पाडणे गरजेचे होते असे अनेकांचे मत होते. मुंबईतील एका मोठ्या वृत्तपत्राने तर वसंतदादांचे सरकार पडल्यावर ही तर श्रींची इच्छा, असा अग्रलेखाचा मथळा दिला होता. पुलोद सरकारमध्ये समाजवादी, शेका पक्ष, जनसंघाचेही मंत्री होते. जनसंघाचे उत्तमराव पाटील, हशू अडवाणी, प्रमिला टोपले यांच्याकडे महत्त्वाची खाती शरद पवारांनी सोपवली होती. हे सरकार पडले नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ते बरखास्त केले.

शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री झाले. लातूरमधील किल्लारी येथे पहाटे ३ वाजता मोठा भूकंप झाल्यावर मुंबईत असणारे पवार सकाळी ७ वाजता स्वत: तिथे जातीने हजर झाले व सर्व शासकीय यंत्रणा कार्यरत करून मदत कार्याला चालना दिली. गुजरातला कच्छला भूकंप झाला तेव्हा सत्तेवर असलेल्या पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पवार हे विरोधी पक्षात असतानाही आपत्कालीन व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद दिले व त्यांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा दिला होता. केंद्रातील मोदी सरकारनेच पवार यांना पद्मविभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. असे असताना शहा व फडणवीस शिर्डीच्या अधिवेशनात पवारांवर का तुटून पडले?

गेल्या दोन-अडीच वर्षांत ठाकरेंची शिवसेना फुटली आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसही फुटली. दोन्ही पक्षांतून बाहेर पडलेले ८० हून जास्त आमदार भाजपाचे समर्थन करीत महायुतीत दाखल झाले. दोन पक्षांत झालेली ही मोठी तोडफोड होती. त्याचे श्रेयही भाजपाच्या नेत्यांनी जाहीरपणे घेतले. लोकसभा निवडणुकीत पवार-ठाकरे यांच्या पक्षांनी भाजपाला धक्का जरूर दिला पण विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांची स्थिती दयनीय झाली. तरीही महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी या दोन पक्षांचे व त्यांच्या नेतृत्वाचे भाजपाला आव्हान का वाटावे? याचे एक प्रमुख कारणे म्हणजे भाजपाला नुसता विजय किंवा नुसते बहुमत मिळवायचे नाही, तर शतप्रतिशत विजय साध्य करायचा आहे.

मोदी-शहा महाराष्ट्राला गुलामीत टाकू पाहत आहे, अफजल खानाच्या फौजा दिल्लीहून महाराष्ट्रावर चाल करून येत आहेत, अब की बार भाजपा तडीपार, महाराष्ट्र द्रोही रावणाचे दहन करा, अशा वल्गना कोण करीत होते? त्यांना जनतेने त्यांची जागा दाखवली म्हटले तर संतापायचे कशासाठी? उबाठा सेनेच्या प्रमुखांच्या पुत्राने गेल्या काही दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तीन वेळा भेट घेतली, स्वत: पक्षप्रमुखांनी मुख्यमंत्र्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्या दिल्या, गडचिरोलीला नक्षलवादी शरण आले व त्या भागात बस सुरू झाली म्हणून मुखपत्राने मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन केले. रोज भाजपा आणि मोदी-शहांच्या विरोधात लेखणी आणि वाणी झिजवत असताना हा बदल कशासाठी हे गूढ आहे. पुन्हा भाजपाशी जमवून घेण्याचे तर प्रयत्न नाहीत नाही? अशी चर्चाही सुरू झाली. पण शिर्डीच्या अधिवेशनात शहा, फडणवीस व बावनकुळे यांनी विश्वासघातकी राजकारणावर जी झोड उठवली त्यातून उबाठा सेनेला भाजपाने महायुतीचे दरवाजे बंद केले आहेत, हा स्पष्ट संदेश दिला आहे.

गुजरातने देशाला व त्या राज्याला अनेक चांगले नेते व प्रशासक दिले. केंद्रातही सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, असे अनेक दिग्गज नेते गृहमंत्री झाले पण त्यात कोणालाही राज्यात तडीपार केलेले नव्हते, असे उपहासात्मक भाष्य शरद पवारांनी करून शहांवर पलटवार करण्याचा प्रयत्न केला. केंद्रातील अन्य मोठ्या नेत्यांशी तुलना करताना कुठे इंद्राचा ऐरावत व कुठे श्याम भट्टाची तट्टाणी अशीही पवारांनी मराठी म्हण ऐकवली.





● राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) ●

## राजगुरू महाविद्यालयात पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न

**राजगुरुनगर : किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने नवीन पाककलेचा शोध घेणे, कृतीवर आधारित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने आयोजित पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यात १४५ विद्यार्थिनींनी नाविन्यपूर्ण व स्वादिष्ट पदार्थ बनवले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक मराठमोळ्या पाककृतींपासून फ्युजन डिशपर्यंत पदार्थ बनवले. पाककला स्पर्धा गोड, पारंपरिक व नाविन्यपूर्ण थाळी अशा तीन प्रकारात घेण्यात आली.

गोड थाळीत प्रथम क्रमांक सिद्धी बोंबले (केक), द्वितीय क्रमांक नियती आंध्रे (लापशी), प्रणाली गोसावी (गुलाबजाम), तृतीय क्रमांक अनुजा महाजन व समृद्धी थिटे (शाही तुकडा) यांचा आला. तर पारंपरिक थाळीत प्रथम क्रमांक ढवळे सिद्धी (मासवडी), द्वितीय क्रमांक सुहानी राक्षे (पाटवडी), तृतीय क्रमांक तनिष्का नेहरे (बासुंदी) व विद्या शिर्के (छोले भटूरे) यांचा आला. नाविन्यपूर्ण थाळीमध्ये प्रथम क्रमांक साक्षी लांडगे (काळ्या तांदळाची खीर), द्वितीय क्रमांक कदम सुजाता (मसाला पापड) व तृतीय क्रमांक पायल कोतवाल-(मॅगी पोहे) व सिद्धी पोखरकर (दहिवडा) यांनी पटकावला.

परीक्षकांनी पदार्थांची चव, मांडणी आणि घटकांचा वापर यावर आधारित मूल्यमापन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. तृप्ती हाडके, प्रा. उषा जाधव, प्रा देविनी साबळे यांनी केले.

## चिंतामणीच्या दर्शनास भाविकांची गर्दी

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पौष महिन्यातील संकष्ट चतुर्थी शुक्रवारी आल्याने भाविकांनी श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटे पासून गर्दी केली होती. पहाटे पुजारी आगलावे बंधु यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली यावेळी विश्वस्त केशव उमेश विद्वांस उपस्थित होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगणात मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने बाल कीर्तनकार ह.भ.प. पाटील (महाराज) आळंदी यांचे



सुभाष्य कीर्तन झाले, चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था करण्यात केली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. देवस्थानचे विश्वस्त केशव उमेश विद्वांस लक्ष ठेवून होते.

## इंधन बचतीची सवय स्वत:पासून लावणे गरजेचे - पिंगळे

**राजगुरुनगर : किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

इंधनासाठी आपल्याला इतर राष्ट्रांवर अवलंबून राहत असल्यामुळे इंधनाची बचत करण्याची सवय सर्वांनी स्वतःपासून लावणे गरजेचे आहे ; असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक द. मा. पिंगळे यांनी येथील राजगुरुनगर एसटी आगारात बोलताना व्यक्त केले.

येथील राजगुरुनगर एसटी आगारात इंधन बचत पंधरवडा तथा कर्मचाऱ्यांकरिता मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, लिलावती नेत्रालयाचे डॉ. संतोष सुपे, डॉ. राहुल जोशी, डॉ. संतोष गवारी, शिवम भालेकर आदी उपस्थित होते.




● राजगुरुनगर एसटी आगारात इंधन बचत पंधरवडा तथा कर्मचाऱ्यांकरिता मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलताना राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक द. मा. पिंगळे व इतर मान्यवर. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) ●

पुढे बोलताना ते म्हणाले, लहान मोठी कामे, जवळच्या अंतरावरची कामे करण्याकरिता गाडीचा वापर न करता पाई फिरून करावा. प्रवासाकरिता एसटी सारख्या सुरक्षित व सार्वजनिक वाहनाचा वापर करावा आणि इंधनाकरिता मोठ्या प्रमाणात जाणारे आपले परकीय चलन वाचवून आपण या प्रकारे आपल्या देशाची सेवा करू शकतो, असेही ते म्हणाले.

आगारव्यवस्थापक उज्वला कुटे म्हणाल्या, इंधनाचे साठे मर्यादित आहेत. एसटी बस चालकांनी सिग्नलच्या ठिकाणी तसेच काही वेळ थांबावे लागणार आहे, अशा ठिकाणी आपली गाडी बंद ठेवावी. व इंधनाची बचत करावी इंधनाचा प्रत्येक थेंब हा मौल्यवान आहे. भविष्याचा विचार करून आपण सर्वांनी इंधनाची बचत करावी. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी अध्यक्ष डॉ. संतोष सुपे व डॉ. राहुल जोशी यांनी डोळ्यांच्या बाबतीत कर्मचाऱ्यांनी वेळेवर नेत्र तपासणी करणे गरजेचे आहे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सूत्रसंचालन दत्तात्रय गबाले यांनी केले तर आभार नागेश्वर वैरागन यांनी मानले. कार्यक्रमानंतर कर्मचाऱ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

## थोडक्यात

### बुरंबाड प्रीमिअर लीगचे आयोजन; आ. शेखर निकम यांची प्रमुख उपस्थिती

**संगमेश्वर-विलास गुरव (आरंभ पर्व) :** येथील बुरंबाड कातळ स्टॉप मैदानावर बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ चे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेला कोकणचे लोकप्रिय आ. शेखर निकम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. जय हनुमान बुरंबाड क्रिकेट क्लब मार्फत बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शनिवार दि. २५ व रविवार दि. २६ अशी दोन दिवस चालणार असून ती लीग स्वरूपाची स्पर्धा असणार आहे. हि स्पर्धा दोन्ही दिवस रात्रीच्या वेळेस खेळविण्यात येणार आहेत. सदर अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेमध्ये ६ संघांचा समावेश राहणार असून प्रत्येक संघाच्या ५ मॅचेस होणार आहेत. दरम्यान, सदर स्पर्धेमध्ये आकर्षक बक्षीसांची खैरात केली असून पहिले बक्षीस रोख रू. २२०००/- व चषक, दुसरे बक्षीस रोख रू. १५०००/- व चषक, तिसरे बक्षीस रोख रू. ४०००/- व चषक तर चौथे बक्षीस रोख रू. ४०००/- व चषक असणार आहे. तसेच बेस्ट बॉलर ट्रॉफी, बेस्ट बॅट्समन ट्रॉफी, मॅन ऑफ द सिरीज ट्रॉफी आणि प्रत्येक मॅचला मॅन ऑफ द मॅच ट्रॉफी देखील असणार आहे. अशा या भव्य क्रिकेट स्पर्धेचे स्वरूप असून याची शोभा वाढविण्याकरिता क्रीडा प्रेमी आणि चिपळूण - संगमेश्वर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार शेखर निकम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हि स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता युवा नेतृत्व अनिरुद्ध शेखर निकम, राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा कार्याध्यक्ष सुशील भायजे, आमदार शेखर निकम यांचे स्विय सहाय्यक अमित सुर्वे,राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस समीर लोटणकर, कळंबुशीचे सामाजिक कार्यकर्ते अक्षय चव्हाण, अमोल नेटके यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तरी या बुरंबाड प्रीमिअर लीग २०२५ निमित्त क्रिकेट प्रेमिंना आनंदाची पर्वणी मिळणार असून क्रिकेट शौकीनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा असे आवाहन जय हनुमान बुरंबाड क्रिकेट क्लब मार्फत करण्यात आले आहे.

### १७ वर्षीय सार्थकने जिंकल्या १७ शर्यती

**पुणे (आरंभ पर्व) :** अवघ्या १७ वर्षांच्या सार्थक चव्हाणने मोटारसायकल शर्यतीच्या क्षेत्रात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर धडाकेबाज कामगिरी केली आहे. 'इंडियन नॅशनल मोटरसायकल रेसिंग चॅम्पियनशिप-२०२४' मधील 'प्रो स्टॉक ३०१-४०० सीसी' या खुल्या श्रेणीतील सर्वांत तरुण राष्ट्रीय विजेता बनण्याचा विक्रम सार्थकने नुकताच केला आहे. या कामगिरीसह सार्थकने १५० ते ४०० सीसी इंजिन क्षमतेच्या मोटारसायकल श्रेणीमध्ये तब्बल १७ शर्यती जिंकल्या आहेत. सार्थकच्या या यशामुळे देशातील सर्वांत तेजस्वी तरुण खेळाडूंपैकी एक म्हणून त्याची ओळख झाली आहे. मूळचा सदाशिव पेठेत राहणाऱ्या सार्थकच्या कुटुंबात दुचाकी शर्यतीचे वातावरण त्याच्या जन्माच्या आधीपासून होते. त्याचे वडील श्रीकांत चव्हाण यांनी अनेक स्पर्धा गाजविल्या. सार्थकने पण याच क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचावे, अशी त्यांची इच्छा होती. याच अनुषंगाने कात्रजमधील मांगडेवाडी येथील 'आर. एस मोटर्स' या त्यांच्या वर्कशॉपमध्ये सार्थकने सराव सुरू केला. अवघ्या सहा वर्षांचा असताना २०१२ मध्ये मुंबईतील 'आयलंड रेस' स्पर्धेत सार्थकने आठ वर्षांच्या खालील वयोगटात तिसरा क्रमांक पटकाविला. त्यानंतर सार्थकने राष्ट्रीय स्तरावर अनेक 'डर्ट ट्रॅक' आणि 'रोड रेस' स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.

## व्यवसायात यशासाठी 'मर किंवा मार' हा निर्धार गरजेचा : डॉ. धनंजय दातार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आज प्रत्येक क्षेत्राप्रमाणे व्यवसायातही तीव्र स्पर्धा आहे. व्यवसायात प्रवेश करणे सोपे असले तरी टिकून राहणे अवघड असते. व्यवसाय हा विरंगुळ्यासाठी किंवा दानधर्मासाठी करायची गोष्ट नसून त्यात नफा हे एकमेव ध्येय समोर ठेवावे लागते. त्यामुळे व्यवसायात यश मिळवायचे असेल तर नवउद्योजकांनी कामाची लाज न बाळगता मेहनत करावी आणि 'मर किंवा मार' (डाय ऑर किल) अशा निर्धारानेच पाय रोवून उभे राहावे, असा सल्ला दुबई स्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय




दातार यांनी नवउद्योजकांना दिला.

'आकार डिजी ९' न्यूज चॅनलतर्फे आयोजित आणि 'ट्रायझॉन कॉर्पोरेट सर्व्हिसेस' तर्फे प्रस्तुत 'दुबई बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२५' या कार्यक्रमात ते बोलत होते. दुबईतील इंडिया क्लबच्या उत्सव हॉलमध्ये हा कार्यक्रम नुकताच झाला. मराठी उद्योजकांना दुबईत व्यवसाय करण्याची संधी मिळावी व बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने आकार 'डिजी ९'चे संस्थापक प्रभाकर सूर्यवंशी यांनी या बिझनेस टूरचे आयोजन केले होते. दुबईतील प्रथितयश मराठी उद्योजकांशी त्यांनी या कार्यक्रमात संवाद साधला.

धनंजय दातार म्हणाले, मी ४० वर्षांपूर्वी दुबईत आलो त्यावेळी जी स्पर्धा होती त्याहून अधिक प्रचंड स्पर्धा सध्या आहे. जगभरातून अनेक उद्योजक या करमुक्त बाजारपेठेचा लाभ घेण्यासाठी येथे गर्दी करत आहेत. अशावेळी आपले अस्तित्व राखायचे असेल तर दुसऱ्यावर मात करावीच लागते. व्यवसाय हा फक्त नफ्यासाठीच करायचा असतो. नफ्याचे मार्जिन कमी ठेऊनही आपण स्पर्धेत तग धरु शकतो. मात्र झटपट नफ्याच्या आशेने आलेल्यांना उतावीळपणाने काही मिळत नाही."

दुबईसारख्या बाजारपेठेत व्यवसायात टिकून राहण्यासाठी संयम लागतोच, परंतु येथील कायद्यांचे काटेकोर पालनही करावे लागते, असे सांगून ते म्हणाले, की नवजात अर्भक जसे तीन वर्षांनी चालायला, बोलायला व स्वतःहून खायला लागते तसेच कोणताही नवा व्यवसाय किमान १००० दिवस चिकाटीने चालवला तरच तो स्वतःच्या पायावर उभा राहतो. मराठी तरुणांनी बदलत्या काळात स्वतःची पारंपरिक बुजरी आणि संकोची वृत्ती सोडून देऊन धाडसाने आपला व्यवसाय जागतिक बाजारपेठांत पोचवला पाहिजे. गुणवत्तापूर्ण उत्पादने व अभिनव सेवा स्पर्धात्मक किंमतीत देऊ केल्यास ते हमखास यशस्वी होतील."

'गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम'चे उपाध्यक्ष राहुल तुळपुळे म्हणाले, की कोणताही व्यवसाय सुरू करताना ग्राहकांना कशाची गरज आहे याचा विचार करुन संधी कशी साधता येईल, याचा विचार नवउद्योजकांनी करावा. गेल्या काही वर्षांत दुबईत बाहेरुन येणाऱ्या व्यावसायिकांची संख्या वाढली असल्याने प्रत्येक क्षेत्रात संधी आहे, हे आढळत आहे.

'बीसीडब्ल्यू इन्शुरन्स कन्सल्टन्सी'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक कोल्हटकर यांनी जोखीम व्यवस्थापनाविषयी (रिस्क मॅनेजमेंट) मार्गदर्शन केले. दुसऱ्या देशात व्यवसाय करताना तेथील बाजारपेठेचा अभ्यास करुन व कल बघून मगच पाऊल टाकावे. मराठी तरुणांना दुबईत व्यवसाय संधींचे मार्गदर्शन करण्यासाठी व दिशा देण्यासाठी गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम कार्यरत आहे, असे त्यांनी नमूद केले.

संयुक्त अरब अमिरातीत (युएई) अनेक वर्षांपासून आरोग्यक्षेत्रात सेवा देणारे डॉ. संजय पैठणकर तसेच या कार्यक्रमाचे प्रायोजक 'क्विक हील'चे ओंकार शेणोलीकर आपले अनुभव सांगितले. श्री. शेणोलीकर यांनी तंत्रज्ञानसंबंधित व्यवसायांबद्दल माहिती दिली.

इतिहासात अटकेपार झेंडा रोवणारा मराठी माणूस कोणत्याही क्षेत्रात मागे नसून अनेक मराठी उद्योजकांनी भारताबाहेर महाराष्ट्राचे नाव मोठे केले आहे. त्यांचा आदर्श घेऊन आगामी काळात अनेक मराठी उद्योजक नक्की घडतील, असा विश्वास प्रभाकर सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. श्वेता घालवाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## थोडक्यात



### वाहतूककोंडीच्या जागतिक क्रमवारीने पुण्याची नाचक्की

पुणे (आरंभ पर्व) : टोमटोम या संस्थेने वाहतूककोंडीच्या संदर्भात जगभरातील ५०० शहरांची पाहणी करून त्यात पुणे शहराला चौथा क्रमांक दिला. दिल्लीपासून गल्लीपर्यंत मागील काही वर्षे सत्ता असलेल्या भारतीय जनता पक्षाचीच ही कर्तबगारी असल्याची टीका करून आम आदमी पार्टीच्या (आप) पुणे शाखेने त्याविरोधात शुक्रवारी सकाळी आंदोलन केले. पुण्याची नाचक्की करून मिळेल, अशा घोषणा देत त्यांनी यांचे संयोजक भारतीय जनता पक्षाचे सत्ताधारीच असल्याचा आरोप केला. आंदोलनात आपच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या पुणे दौऱ्यात काही महिन्यांपूर्वी पुण्यातील वाहतूककोंडीबाबत व्यक्त केलेल्या जाहीर नाराजीचाही उल्लेख केला. त्याचबरोबर थेट राष्ट्रपतींनी व्यक्त केलेल्या नाराजीची दखल भाजपच्या जबाबदार सत्ताधिकाऱ्यांनी घेतली नाही, त्यामुळेच आधीच सातवा असलेला क्रमांक आता चौथा झाला असेही आंदोलन पाहण्यासाठी जमलेल्या पुणेकरांना सांगितले. साखर संकुल चौकात सकाळी ११ वाजता झालेल्या या आंदोलनात सुबह शाम सभी रस्ते जाम ही जाम अशाही घोषणा दिल्या. महापालिका, राज्यात व दिल्लीतही गेली काही वर्षे भाजपची सत्ता आहे, मात्र त्यांनी पुणे शहरासाठी मोठमोठ्या घोषणा करण्याव्यतिरिक्त काहीही केले नाही, अशी टीका यावेळी करण्यात आली. पक्षाचे राज्य प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदी यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पात पुण्याचा समावेश केला. त्यासाठी काही कोटी रुपयांचा खर्च झाला. फक्त अत्याधुनिक सिग्नल्ससाठीच काही कोटी रुपये खर्च करण्यात आले. प्रत्यक्षात मात्र पुणे आहे तिथेच राहिले असे नाही तर आहे त्यापेक्षाही खाली गेले. पुणेकरांनी भाजपला सगळी राजकीय सत्ता दिली, ते मात्र भ्रष्टाचार व बेजबाबदार कारभार याशिवाय दुसरे काहीच द्यायला तयार नाहीत. सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर, शंकर थोरात, सुरेखा भोसले, अक्षय शिंदे, प्रशांत कांबळे, मिलिंद ओव्हाळ, सुभाष कारंडे, शेखर ढगे, कुमार घोंगडे, संजय कटारनवरे, सैद अली, संतोष काळे, सुनील सौदी, फबीयन सॅमसन, अभिजित मोरे, अमित म्हस्के, विकास चव्हाण, शिवाजी डोलारे, कविता गायकवाड व पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

### मेट्रोच्या जागेतील ५० झोपड्या महापालिकेने हटविल्या

पुणे (आरंभ पर्व) : शिवाजीनगर दिवाणी न्यायालय (सिव्हिल कोर्ट) मेट्रो स्टेशनजवळ असलेल्या डेंगळे पुलाजवळ उभारण्यात आलेल्या ५० झोपड्यांवर कारवाई केली. मेट्रोच्या जागेत या बेकायदा झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. अतिक्रमण काढून टाकण्याची मागणी पुणे मेट्रोच्या वतीने महापालिकेकडे करण्यात आली होती. शहरातील रस्त्यांवर वाढत असलेले अतिक्रमण, बेकायदा फेरीवाले तसेच अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करण्याबाबत चर्चा झाली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी कारवाई करण्याचे आदेश महापालिकेतील विविध विभागांना दिले आहेत. त्यानुसार मेट्रोच्या जागेत उभारण्यात आलेल्या झोपड्यांवर कारवाई करून त्या काढून टाकण्यात आल्या. पहाटे साडेपाच ते दहा या वेळेत ही कारवाई करण्यात आली. पुणे महपालिकेचे परिमंडळ दोनचे उपायुक्त अविनाश संकपाळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये सहायक महापालिका आयुक्त गोविंद दांगट, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ४ पोलिस निरीक्षक, सुरक्षा अधिकारी व इतर विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते. पुणे मेट्रोच्या जागेतील बेकायदा अतिक्रमण काढून टाकण्यात आले आणि येथील साहित्य मेट्रो विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. मेट्रोची स्थानके उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा महापालिकेने मेट्रोकडे हस्तांतरित केलेल्या आहेत. महापालिकेकडून देण्यात आलेल्या या जागांची काळजी घेणे, निगा राखणे, त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही याकडे लक्ष देण्याची जबाबदारी महामेट्रोची आहे. मात्र, महामेट्रो प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे वारंवार दिसून आले आहे. यापुढे तरी मेट्रोने गांभीर्याने पाहून यापुढील काळात अतिक्रमणे होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

### मला नको 'लाडकी'चा लाभ; लाडक्या बहिणीने स्वतःहून योजना नाकारली

पुणे (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'च्या लाभार्थ्यांना आता सरकारकडून स्वतःहून 'लाभ' सोडण्यासाठी आवाहन केले गेले होते. इतर योजनेचा लाभ घेत याही योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांवर कारवाईचा इशाराही दिला होता. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील एका लाभार्थ्याने लाडकी बहीण योजनेचा लाभ नको, म्हणून अर्ज दिला आहे. विशेष म्हणजे, संबंधित लाभार्थी या जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्ती कर्मचारी आहेत. काही दिवसांपूर्वी, महिला व बालकल्याण विभागाचे सचिव डॉ. अनूप कुमार यादव यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे राज्यातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यामध्ये इतर योजनांचा लाभ घेणारे व ज्यांना लाडकी बहिणीच्या योजनेची गरज नाही, अशा लाभार्थ्यांचे अर्ज अपात्र ठरवण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या नावाने प्रत्येक जिल्ह्याला लॉगिन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार कार्यवाही सुरू झाली आहे. जिल्ह्यात २१ लाख ११ हजार ९९१ बहिणींनी योजनेसाठी अर्ज केले होते. त्यापैकी २० लाख ८९ हजार ९४६ महिलांना योजनेचा लाभ मिळाला आहे. मात्र, आता सरकारने अपात्र लाभार्थ्यांना स्वतःहून 'लाभ' सोडण्यासाठी आवाहन करत कारवाईचा इशारा दिल्याने शुक्रवारी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे एका लाभार्थ्यांचा लाभ बंद करण्याबाबतचा अर्ज आला आहे. संबंधित लाभार्थी या जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. त्यांना पेन्शनचा लाभ मिळत आहे. त्यांनी दिलेल्या अर्जामध्ये इथून पुढे मला लाडकी बहीण योजनेचा लाभ नको, असे नमूद केले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील अपात्र लाभार्थ्यांनी तत्काळ स्वतःहून 'लाभ' सोडण्याचे आवाहन महिला व बालकल्याण विभागाने केले आहे.

# स्विगीकडून 'स्विगी सर्व्हज'चे अनावरण

## पहिले भागीदार म्हणून रॉबीन हूड आर्मीची घोषणा : २०३० पर्यंत गरीबांना ५० दशलक्ष आहार वितरित करण्यासाठी वचनबद्ध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्विगी , या भारतातील आघाडीच्या ऑन डिमांड सुलभता प्लॅटफॉर्मने आज "स्विगी सर्व्हज" या आपल्या विशेष उपक्रमाची घोषणा केली असून त्याचे उद्दिष्ट आपल्या मूल्यसाखळीतील अन्नाची नासाडी कमी करून भुकेल्यांना ते देण्याचे आहे. या मोहिमेचा भाग म्हणून स्विगीने रॉबीन हूड आर्मी (आरएचए) या स्वयंसेवी संघटनेसोबत भागीदारीची घोषणा केली आहे. स्विगी आणि आरएचए एकत्रितरित्या स्विगीच्या रेस्टॉरंट भागीदारांकडून उर्वरित अन्न वंचित समाजाला वाटून एक चांगला प्रभाव साध्य करणार आहेत. या सहयोगाच्या माध्यमातून या दोन्ही संस्थांनी अन्न पुनर्वितरणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून २०३० पर्यंत ५० दशलक्ष आहार देण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय समोर ठेवले आहे.




स्विगी सर्व्हज- आरएचए भागीदारीच्या पहिल्या टप्प्यातून प्रोत्साहक निकाल आले आहेत. जवळपास ३३ शहरांमधून २००० पेक्षा जास्त जेवणए पुनर्वितरित करण्यात आली असून १२६ पेक्षा अधिक रेस्टॉरंट भागीदार याचा हिस्सा झाले आहेत. हा उपक्रम स्विगीच्या अन्नाची नासाडी कमी करून भुकेशी सामना करण्यासाठी अतिरिक्त अनाचा स्त्रोत म्हणून वापरण्याच्या ध्येयाशी निगडीत आहे.

बिक्कगने बिर्यानी, बिर्यानी बाय किलो, दाना चोगा, वर्धाज, चारकोल ईट्स- बिर्यानी अँड बियॉन्ड, डब्बा गरम, हाऊस ऑफ बिर्यानी, बी. टेक मोमोजवाला, समोसा सिंग, बाबाई टिफिन्स, डोसा अण्णा, अर्बन तंदूर अशा ब्रँड्सनी स्विगी सर्व्हज- आरएचए उपक्रमाचा भाग होण्यासाठी साइन केले आहे.

रॉबीन हूड आर्मी (आरएचए) ही एक स्वयंसेवी, शून्य निधी संस्था असून यात हजारो तरूण व्यावसायिक, निवृत्त नागरिक, गृहिणी, महाविद्यालयीन विद्यार्थी स्वयंसेवक आहेत. या स्वयंसेवकांना रॉबीन असे म्हटले जाते आणि ते रेस्टॉरंट्स/ लग्न/ कार्यक्रमातून अतिरिक्त अन्न गोळा करून गरीबांमध्ये त्याचे वाटप करतात. मागील दहा वर्षांत आरएचएने जगभरातील ४०६ शहरांमध्ये १५३ दशलक्षपेक्षा जास्त जेवणे वितरित केली आहेत. सध्या १३ शहरांमध्ये २६०,००० पेक्षा अधिक नोंदणीकृत रॉबीन्स शून्य निधी या तत्वावर शून्य भूक ही संकल्पना साध्य करण्यासाठी कार्यरत आहेत.

या अनावरणाबाबत बोलताना स्विगी फूड मार्केटप्लेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित कपूर म्हणाले की, "स्विगीमध्ये आम्ही कायम लॉजिस्टिक्स आणि ग्राहकानुभव यांचे तज्ञ म्हणून काम केले आहे. आता 'स्विगी सर्व्हज' च्या माध्यमातून आम्ही आमच्या शक्ती आणि क्षमतेचा वापर करून व्यापक सामाजिक गरजेवर तसेच अन्नाची नासाडी आणि भूक अशा समस्यांवर उपाय काढण्यासाठी काम करत आहोत. आम्हाला आमच्या रेस्टॉरंट भागीदारांकडील अतिरिक्त अन्नाचे गरजू लोकांना पुनर्वितरण करण्यासाठी आरएचएसोबत भागीदारी करताना खूप आनंद होत आहे. सध्या आम्ही ३३ शहरांमध्ये कार्यरत आहोत आणि जास्तीत जास्त शहरांमध्ये हा उपक्रम नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. यातून फक्त कचरा कमी होणार नाही तर अर्थपूर्ण प्रभाव पडेल आणि एकही जेवण वाया जाणार नाही."

रॉबीन हूड आर्मीचे सहसंस्थापक नील घोस यांनी स्विगीसोबतच्या भागीदारीबाबत बोलताना सांगितले की,"भूक कमी करण्याच्या एकत्रित मोहिमेसाठी रॉबीन हूड आर्मीला स्विगीसोबत काम काम करताना खूप आनंद होत आहे. स्विगीसारखी उद्योगातील आघाडीची कंपनी सामाजिक चळवळीसाठी एकत्र येते तेव्हा त्याचा प्रभाव वाढतो आणि भुकेविरूद्ध लढण्यासाठी इतरांना सोबत येण्याची प्रेरणा मिळते.

**रेस्टॉरंट भागीदार स्विगी ओनर ॲपवरील एक अर्ज भरून अतिरिक्त किंवा ताजे अन्न दान करण्याची आपली इच्छा वर्तवू शकतात व स्विगी सर्व्हजचा भाग होऊ शकतात. नावनोंदणी झाल्यानंतर आरएचए या सहजसंवाद आणि समन्वयासाठी या रेस्टॉरंट भागीदारांना संबंधित व्हॉट्सएप ग्रुपमध्ये सहबागी करेल. या भागीदारांकडून अतिरिक्त अन्न नेण्याची आणि गरजू लोकांमध्ये त्याचे वितरण करण्याची जबाबदारी आरएचए स्वयंसेवकांची असेल.**

**संयुक्त राष्ट्रांच्या मते भारतात सुमारे १९५ दशलक्ष कुपोषित लोक असून ही जगातील कुपोषित लोकसंख्येच्या एक चतुर्थांश संख्या आहे. २०२४ मध्ये भारताचा जागतिक भूक निर्देशांक (जीएचआय) २७.३ होता. त्यातून भूक ही गंभीर समस्या असल्याचे स्पष्ट झाले. २०२४ च्या जीएचआयमध्ये भारताचा १२७ देशांमध्ये १०५ वा क्रमांक आला. संयुक्त राष्ट्रांच्या मते भारतात दर वर्षी दरडोई ५५ किलो अन्न वाया जाते.**

## मुलीसोबत कॅफेमध्ये बसल्याचा राग; युवकावर वार...

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

नात्यातील एका मुलीसोबत कॅफेमध्ये बसल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरुन येथील एका युवकावर दुस-या युवकाने कोयत्याने वार केल्याची घटना बारामतीत घडली. या संदर्भात सिध्दार्थ सुनील चौधर (वय 19, रा. वंजारवाडी, ता. बारामती) याने फिर्याद दिली असून त्याच्या फिर्यादीवरुन तालुका पोलिसांनी नागेश ज्ञानदेव गोफणे (रा. वंजारवाडी, ता. बारामती) याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी (ता. 17) संध्याकाळी नात्यातील एका मुलीसोबत नागेश गोफणे एका कॅफेमध्ये बसला होता, ही घटना पाहिल्यानंतर त्याचा जाब सिध्दार्थ याने नागेशला विचारल्याचा राग मनात धरुन नागेश याने सिध्दार्थ याच्यावर कोयत्याने मानेवर, पाठीत व मांडीवर वार केले. डोक्यात कोयता मारत असताना तो वार हातावर घेतल्याने हाताला दुखापत झाल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या प्रकरणी तालुका पोलिसांनी नागेश गोफणे विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. कोयत्याने मारहाण होण्याची गेल्या काही दिवसातील ही तिसरी घटना आहे. पोलिस नेमके काय करत आहेत असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. गोपनीय नावाचा विभाग काय करतो, गावात सुरु असलेल्या घडामोडींची माहिती पोलिसांना का मिळत नाही, एखाद्याचा जीव जाईपर्यंत वाट बघीतली जाणार का, अशी लोकात चर्चा आहे. बारामती शहर व बारामती तालुका पोलिस ठाण्यात घडणा-या घडामोडींची माहिती माध्यमांपासून दडवून ठेवली जाते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिरादार व उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी अनेकदा सूचना देऊन दोन्ही पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी त्यांनाही जुमानतच नाही असेच चित्र वारंवार समोर येते. पोलिसांचा बारामतीत वचकच राहिलेला नाही, गुन्ह्यांचा तपास होत नाही, माहिती लोकांपर्यंत जाऊच दिली जात नाही.

### एफआयआर पब्लिश केली जात नाही...

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एफआयआर दाखल झाल्यानंतर काही अपवाद वगळता इतर सर्व एफआयआर चोवीस तासात लोकांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर टाकणे बंधनकारक आहे. प्रत्यक्षात मनाला येईल तेव्हा हे काम केले जाते. वरिष्ठ अधिकारीही या कडे कानाडोळा करतात, अनेक एफआयआर टाकल्या जातात की नाही हाही एक संशोधनाचाच विषय आहे. एकीकडे वरिष्ठांचे दुर्लक्ष व दुसरीकडे प्रभारी अधिकारी वरिष्ठांना जुमानत नसल्याने बारामतीत पोलिस दलात फेरबदलाची नागरिकांची मागणी होत आहे.**

बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेत रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी

## विशेष जनजागृती सत्राचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिवाळा कोणाला आवडत नाही, पण या हिवाळ्यात खोकला, सर्दी आणि श्वसनाचे आजार उद्भवले की, थंडीची मजाच विरून जाते. सामान्यत: तापमान आणि बदलत्या हवामानामुळे माणसाच्या शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे हे आजार होतात. अशा परिस्थितीत, हजारो वर्षांपासून प्रसिद्ध असलेले आणि लाखो लोकांनी यशस्वीरित्या प्रयोग केलेले आयुर्वेदिक उत्पादन च्यवनप्रास खूप दिलासा देते. डाबर च्यवनप्राशचे सेवन केल्याने आपली प्रतिकारशक्ती वाढवून या ऋतूत वारंवार होणाऱ्या खोकला आणि सर्दी यांसारख्या आजारांपासून तर आपले संरक्षण होतेच शिवाय आपल्या शरीरातील अनेक अवयवांचे कार्य सुधारून शरीर मजबूत होते.



डाबरच्या प्रमुख आरोग्य सेवा ब्रँड डाबर च्यवनप्राशने देशभरातील वंचित मुलांना सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने एक मेगा जागरूकता उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली. या उपक्रमांतर्गत, डाबर च्यवनप्राशने अग्रगण्य डॉक्टरांच्या सहकार्याने मुलांना बदलणारे हवामान, सामान्य जीवाणू आणि विषाणूंशी लढण्यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करण्याची आवश्यकता याविषयी शिक्षित करण्यासाठी रोग प्रतिकारशक्ती सत्र आयोजित केले.

पुणे येथील बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेत 300 हून अधिक मुलांसह एक विशेष जनजागृती सत्र आयोजित केले गेले. विशेष सत्राद्वारे या मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेचे नितीन वाणी, सुनिता जाधव, प्रदीप गवळी, स्वाती लोहकरे, संजीवनी सोनार, सुरेखा डफळ, कल्याणी गाडे, निर्मला चौधरी आणि डाबर इंडिया लिमिटेडचे दिनेश कुमार उपस्थित होते. हिवाळ्यात आजारांशी लढण्यासाठी मुलांमध्ये जागृती निर्माण करणे हा या सत्राचा उद्देश होता. मूलभूत स्वच्छता आणि पौष्टिक आहाराद्वारे त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे मार्गही मुलांना शिकवले गेले.

याप्रसंगी बोलतांना, श्री अमित गर्ग, मार्केटिंग हेड – हेल्थ सप्लीमेंट्स, डाबर इंडिया लिमिटेड म्हणाले, "डाबर च्यवनप्राश प्रत्येक भारतीयाला 100 वर्षांहून अधिक मजबूत प्रतिकारशक्ती प्राप्त करण्यास मदत करण्यासाठी वचनबद्ध आहे या मुलांना च्यवनप्राश पुरवण्याबरोबरच दरवर्षी अनेकांचा जीव घेणाऱ्या शीतलहरीबद्दलही आम्ही चिंतित आहोत. आम्ही वंचित मुलांना उघड करून त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करू."

डॉ. परमेश्वर अरोरा, एमडी (आयुर्वेद), म्हणाले, "हवामान बदलाच्या चक्रात अचानक तापमानात बदल होतो, जो खोकला, सर्दी आणि फ्लू, श्वासोच्छवासाच्या समस्या, कमी प्रतिकारशक्ती इ. सारख्या आजारांना कारणीभूत असतो डाबर च्यवनप्राश हा रोगांशी लढण्याचा प्रभावी उपाय आहे. या मोहिमेअंतर्गत आग्रा, वाराणसी, गोरखपूर, लखनौ, उदयपूर, जयपूर, भुवनेश्वर, कोलकाता, सिलीगुडी, पाटणा, गया, इंदूर, रायपूर, पुणे, औरंगाबाद, रांची, बेंगळुरू, मुंबई या 22 शहरांमध्ये डाबर च्यवनप्राश उपलब्ध आहे. नाशिक, नागपूर यांनी ग्वाल्हेर आणि भोपाळच्या आघाडीच्या स्वयंसेवी संस्थांशी हातमिळवणी केली आहे.

च्यवनप्राश हे जवळपास 3000 वर्षे जुने प्रसिद्ध आयुर्वेदिक फॉर्म्युलेशन आहे, ज्याचा उपयोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि खोकला आणि सर्दी यांसारख्या दैनंदिन संसर्गापासून प्रतिकार करण्यासाठी केला जातो. डाबर च्यवनप्राशचा मुख्य घटक आवळा आहे जो रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या गुणधर्मांसाठी ओळखला जातो. गुडूची, पिपली, शतावरी, विदारिकंद, हरितकी, कांतकरी, काकडशिनी, भूमिमाकी, वसाका, पुष्करमुल, प्रिशिपर्णी, शालापर्णी इत्यादी इतर घटक सामान्य संक्रमण आणि श्वसनमार्गाच्या ॲलर्जी कमी करण्यास मदत करतात. डाबर च्यवनप्राश हे या औषधी वनस्पती आणि घटकांचे परिपूर्ण मिश्रण आहे जे हिवाळ्याच्या हंगामात चांगल्या आरोग्यासाठी प्रतिकारशक्ती प्रदान करते.

# 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च

- **उत्तम कथानकाला रंजकतेची जोड असलेल्या "मुक्काम पोस्ट देवाचं घर" चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आपण पाठवलेलं पत्र अमेरिकेला पोहोचतं, तर देवाच्या घरी नक्की पोहोचेल असं वाटणाऱ्या एका लहान निरागस मुलीचा देवाच्या घराचा शोध "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या चित्रपटातून उलगडणार आहे. हृदयस्पर्शी आणि मनोरंजक कथानक असलेल्या या चित्रपटाचा ट्रेलर लाँच नुकताच सुप्रसिद्ध अभिनेते, निर्माते दिग्दर्शक सचिन पिळगांवकर यांच्या मुख्य उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आवर्जून उपस्थित होते. येत्या ३१ जानेवारीला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.



लहान मुलांच्या भावविश्वात खूप काही सुरू असतं. मुलांना अनेक प्रश्न पडत असतात. त्या प्रश्नांची उत्तरं मुलं आपल्या पद्धतीनं शोधण्याचा प्रयत्न करतात. "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या चित्रपटात ग्रामीण भागातली गोष्ट मांडण्यात आली आहे. सैन्यात असलेले वडील देवाघरी गेले असं आईनं मुलीला सांगितल्यावर देवाचं म्हणजे काय ? आणि ते कुठे असतं? याचा शोध सुरू होतो. त्याबरोबरच तिची आई आपल्या शहीद झालेल्या पतीचं पेन्शन मिळवण्यासाठी संघर्ष करत असल्याचं ट्रेलरमधून दिसतं. त्यामुळे भावनिकतेची किनार असलेल्या या कथानकाची मांडणी अतिशय हलक्याफुलक्या, रंजक पद्धतीनं केल्याचं ट्रेलरमधून समजतं आहे. श्रवणीय संगीताचीही जोड या कथानकाला असून "सुंदर परिवानी" ह्या गोड गीताला प्रेक्षकांची चांगलीच पसंती मिळाली आहे.

एखादी चांगली कलाकृती तुम्ही केल्यावर नक्कीच त्यामागे अनेकजण पाठीशी खंबीरपणे उभे राहतात त्याचप्रमाणेच मंगेश ही या कलाकृतीच्या मागे प्रस्तुतकर्ता म्हणून उभा राहिला.चित्रपटाचा ट्रेलर मला खुप आवडला. दिग्दर्शक संकेतने या चित्रपटाची मांडणी उत्तम केली असल्याचे ट्रेलर मधून दिसून येते आहे. मायराने या चित्रपटात साकारलेली प्रमुख भूमिका उल्लेखनीय असल्याचे ट्रेलर मधून जाणवते आहे. तिने यात सातत्य ठेऊन अनेक उत्तम भूमिका साकारुन मनोरंजन विश्वात अजुन नाव कामवावे यासाठी माझे तिला अनेक आशीर्वाद असल्याचे सचिन पिळगांवकर यांनी सांगितले

मनीष कुमार जायसवाल आणि मंगेश देसाई यांनी 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. कीमाया प्रॉडक्शनचे महेश कुमार जायसवाल, किर्ती जायसवाल हे या चित्रपटाचे निर्माते असून त्यांची ही पहिलीच निर्मिति आहे तर वैशाली संजू राठोड, सचिन नारकर, विकास पवार हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन संकेत माने यांचे असून संकेत माने, सुमित गिरी यांनी पटकथालेखन, सुमित गिरी यांनी संवादलेखन केले आहे. या चित्रपटात मायरा वायकूळ, मंगेश देसाई, कल्याणी मुळे, प्रथमेश परब, रेशम श्रीवर्धन, सविता मालपेकर, उषा नाडकर्णी, माधवी जुवेकर, कमलेश सावंत, स्पृहा परब, रुक्मिणी सुतार यांच्या मध्यवर्ती भूमिका चित्रपटात पहायला मिळणार असून अभिनेत्री पूजा सावंत ही पाहूण्या कलाकारच्या भूमिकेतून आपल्या भेटीस येणार आहे.चित्रपटाचे छायाचित्रण रोहन मडकईकर यांनी केले असून गीतकार मंगेश कांगणे यांनी लिहिलेल्या गीताना चिनार महेश यांचे श्रवणीय संगीत लाभले आहे. पार्श्वसंगीत आदित्य बेडेकर याचे असून कार्यकारी निर्माता म्हणून अतुल साळवे यांनी काम पाहिले आहे.

तर असा हा सहकुटुंब पाहता येणारा चित्रपट येत्या ३१ जानेवारीला चित्रपटगृहात जाऊन नक्कीच पाहावा लागेल यात शंका नाही.

# सिंहगड रस्त्यावर चंदन चोरी करणारा गजाआड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्ता भागात एका बंगल्यातून चंदनाचे झाड कापून नेणाऱ्या चोरट्याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक लाख रुपयांचे चंदनाची झाडाचे ओंडके जप्त करण्यात आले.

भरत शिवाजी जाधव (वय ३४, रा. केडगाव चौफुला, गडदे वस्ती, ता. दौंड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. धायरी भागातील एका बंगल्याच्या आवारातील चंदनाचे झाड कापून नेण्यात आल्याची घटना नुकतीच घडली होती. सिंहगड रस्ता पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत होता. वडगाव भागातील कॅनॉल रस्त्यावर एक जण थांबला असून, त्याच्याकडील पोत्यात चंदनाचे ओंडके असल्याची माहिती गस्त घालणारे पोलीस कर्मचारी शिवाजी क्षीरसागर यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडील पोत्याची तपासणी करण्यात आली. तेव्हा पोत्यात चंदनाचे ओंडके सापडले.

चंदन चोरटा जाधव याच्याविरुद्ध यापूर्वी यवत आणि हवेली पोलीस ठाण्यात चंदन चोरीचे गुन्हे दाखल झाले होते.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिली दाईंगडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक उत्तम भजनावळे, सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, आबा उत्तेकर, संजय शिंदे, उत्तम तारु, अण्णा केकाण, अमोल पाटील, विनायक क्षीरसागर यांनी ही कारवाई केली.





## सौ. प्रतिक्षा मानकर ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मानित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट ज्ञानदा इन्स्टिट्यूट तर्फे समाजात विविध क्षेत्रात राबणाऱ्या महिलांचा सन्मान शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी मराठवाडा मित्र मंडळ, डेक्कन जिमखाना पुणे येथे संपन्न झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीला सातत्याने अन्यायाला अत्याचाराला सामोरे जावे लागत होते. अत्यंत कठोर, प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी सावित्रीबाई फुले या महात्मा फुलेंच्या बरोबरीने सिद्ध झाल्या. त्यासाठी त्यांनी पहिली मुलींची शाळाही काढली. त्याचाच दूरगामी परिणाम म्हणजे आजच्या काळातली स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासपूर्वक निर्भयतेने पुढे आलेली दिसते. अशा त्यागी भावनेने विविध पातळीवर योगदान देणाऱ्या यशस्वी महिलांचा पुणे येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, प्राथमिक, पुणे जिल्हा परिषद श्री. विठ्ठलराव केंद्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी सौ. प्रतिक्षा महेश मानकर यांचा राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा भारती अंकलेल्लू यांनी केले तर यावेळी ज्ञानदा इन्स्टिट्यूटचे संचालक जयंत कुलकर्णी हे देखील उपस्थित होते.

# पुरस्कार म्हणजे जबाबदारी : सुरेखा सावंत-मते

### राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने दै. आरंभ पर्वच्या संपादिका सन्मानित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट ज्ञानदा इन्स्टिट्यूट तर्फे समाजात विविध क्षेत्रात राबणाऱ्या महिलांचा सन्मान शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी मराठवाडा मित्र मंडळ, डेक्कन जिमखाना पुणे येथे संपन्न झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीला सातत्याने अन्यायाला अत्याचाराला सामोरे जावे लागत होते. अत्यंत कठोर, प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी सावित्रीबाई फुले या महात्मा फुलेंच्या बरोबरीने सिद्ध झाल्या. त्यासाठी त्यांनी पहिली मुलींची शाळाही काढली. त्याचाच दूरगामी परिणाम म्हणजे आजच्या काळातली स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासपूर्वक निर्भयतेने पुढे आलेली दिसते. अशा त्यागी भावनेने विविध पातळीवर योगदान देणाऱ्या यशस्वी महिलांचा पुणे येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, प्राथमिक, पुणे जिल्हा परिषद श्री. विठ्ठलराव केंद्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



यावेळी दै. 'आरंभ पर्व'च्या संपादिका सौ. सुरेखा सावंत-मते म्हणाल्या की, समाजात महिलांचा होणार सन्मान कौतुकास्पद आहे. महिला या नेहमीच प्रत्येक क्षेत्रात स्वत:ला सिद्ध करत आहेत. पुरस्कार मिळणे आणि सन्मान होणे म्हणजे जबाबदारीत वाढ होणे. यापुढे जी काही जबाबदारी समोर येईल ती चोखपणे बजावेल.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा भारती अंकलेल्लू यांनी केले तर यावेळी ज्ञानदा इन्स्टिट्यूटचे संचालक जयंत कुलकर्णी हे देखील उपस्थित होते.

## प्रभात रस्त्यावर व्यावसायिकाचा मोबाइल चोरणारा गजाआड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभात रस्त्यावर व्यावसायिकाचा मोबाइल चोरुन पसार झालेल्या चोरट्याला डेक्कन पोलिसांनी अटक केली. चोरट्याने डेक्कन, तसेच बाणेर परिसरात मोबाइल चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. चोरट्याकडून चार मोबाइल संच जप्त करण्यात आले आहेत.

हबीब अबालू इराणी (वय २४, रा. पाटील इस्टेट, मुंबई-पुणे रस्ता आणि फ्रेंडस रेसीडन्सी, मुंब्रा, जि. ठाणे) असे केलेल्या चोरट्याचे नाव आहे. प्रभात रस्त्यावर एका व्यावसायिकाचा मोबाइल संच इराणीने चोरुन नेल्याची घटना नुकतीच घडली होती. याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. पसार झालेल्या चोरट्याचा माग काढण्यात येत होता. तांत्रिक तपासात मिळालेल्या माहितीवरुन इराणीला सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. इराणी सराइत असून, यापूर्वी त्याच्याविरुद्ध यवत, लोहमार्ग पोलीस ठाणे, हडपसर पोलीस ठाण्यात चोरीचे गुन्हे दाखल झाले होते. त्याने बाणेर भागात एका पादचाऱ्याकडील मोबाइल संच चोरुन नेल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याच्याकडून चार मोबाइल संच जप्त करण्यात आले. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रसाद राऊत, उपनिरीक्षक महेश भोसले, अजय भोसले, दत्तात्रय सावंत, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, राजेंद्र मारणे, धनश्री सुपेकर, गभाले, महेश शिरसाठ यांनी ही कामागिरी केली.

## थोडक्यात



### पतीचा ओढणीने गळा आवळून खून, नऱ्हे भागातील घटना

**पुणे (आरंभ पर्व) :** चारित्र्याच्या संशयातून पतीचा ओढणीने गळा आवळून खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे भागात घडली. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी पतीला अटक केली. रेश्मा भिकू खुडे (वय ३२, सध्या रा. कुटे मळा, मानाजीनगर, नऱ्हे, मूळ रा. वडूज, जि. सातारा) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी कुमार कलगोंडा पाटील (वय ४२, मूळ रा. इचलकरंजी, कोल्हापूर) याला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेश्मा यांचा पहिला विवाह झाला होता. पतीसोबत पटत नसल्याने त्यांनी आरोपी कुमारशी दुसरा विवाह केला. पहिल्या पतीपासून त्यांना दोन मुले होते. महिनाभरापूर्वी त्या कुमार याच्यासोबत नऱ्हे भागात राहायला आल्या होत्या. कुमार रेश्मा यांच्या चारित्र्याचा संशय घेत होता. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाले होते. शुक्रवारी सायंकाळी कुमार कामावरुन घरी आला. त्याने पुन्हा रेश्मा यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादातून त्याने रेश्मा यांचा ओढणीने गळा आवळून खून केला. या घटनेची माहिती मिळताच सिंहगड रस्ता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी पती कुमारला अटक करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सागर पवार तपास करत आहेत.

## आज पुण्यात : १९ जानेवारी २०२५

**स्वयंरोजगार मेळावा :** रोटरी डिस्ट्रिक ३१३१ ह्यूमन डेव्हलपमेंट अव्हेन्यू आयोजित : दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार, स्वयंरोजगार मेळावा, तसेच उपकरणांचे मोफत वाटप : गणेश कला क्रीडा मंच, नेहरू स्टेडियम, स्वारगेट : ८.३०.

**गुलाब प्रदर्शन :** रोझ सोसायटी ऑफ पुणे आयोजित : ११० व गुलाब प्रदर्शन : प्रदर्शनाचा बक्षीस वितरण समारंभ : हस्ते- डॉ. रोहित टिळक व डॉ. प्रणिती टिळक : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मुकुंदनगर : ९.००.

**आंतरराष्ट्रीय परिषद :** इंडियन इन्स्टिट्यूट फॉर सोशल डेव्हलपमेंट अँड रिसर्च संचालित राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय (खेड, जि. अहिल्यानगर), महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, ग्लोबल फाऊंडेशन आणि पॅनजिया जिओग्राफिकल असोसिएशन आयोजित 'पर्यावरणीय न्याय : दक्षिण आशियातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक समस्या' या विषयावर आंतरराष्ट्रीय बहुविषयक परिषद : उद्‌घाटन हस्ते- डॉ. मुनथेर इब्राहिम : प्रमुख पाहुणे- प्रकाशन महानवर : गांधी भवन, कोथरूड : १०.००.

**कृतज्ञता सन्मान व कविसंमेलन :** रंगत-संगत प्रतिष्ठानचा काव्य विभाग व काव्यशिल्प आयोजित : जयंत भिडे यांचा कृतज्ञता सन्मान : निमंत्रितांचे कविसंमेलन : सहभाग- अश्विनी पिंगळे, भारती पांडे, मीरा शिंदे, सुधीर कुबेर, सीताराम नरके व अन्य : भारत स्काउट ग्राउंड, उद्यान प्रसाद कार्यालयासमोर, सदाशिव पेठ : १०.३०.

**सायंकाळी : पुरस्कार वितरण :** गुरुकुल परिवारातर्फे : गुरुकुल पुरस्कार २४-२५ : पुरस्कारार्थी- लक्ष्मी साठे, कालिंदी दाणी, राजेंद्र कुळकर्णी, रोहिणी काळे व राधिका गोखले : आनंद सभागृह, महाराष्ट्र विद्या मंडळ, लॉ कॉलेज रस्ता : ५.००.

**पुस्तक प्रकाशन :** बुकगंगा पब्लिकेशन्स आयोजित : डॉ. शिल्पा चिटणीस-जोशी लिखित 'तुमच्या डॉक्टर मैत्रिणींशी हितगुज' (भाग १ ते ३) पुस्तकांचे प्रकाशन : भांडारकर रिसर्च इस्टिट्यूट ऑडिटोरियम, कॉलेज रस्ता : ५.३०.

**पाठांतर स्पर्धा व बक्षीस वितरण :** समर्थ भारत अभियान आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आयोजित : राज्यस्तरीय मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा व बक्षीस वितरण : उपस्थिती- डॉ. राम साठे, सुहास क्षीरसागर : कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर : ५.३०.

# पर्यावरण नियमांमुळे गृहनिर्माण क्षेत्राची कोंडी!

### नियामक संस्थाकडून वाढलेल्या कारवाईवर 'क्रेडाई'चे बोट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्यावरणविषयक नियमांच्या नावाखाली विकासकांच्या विरोधात तक्रार करण्याचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. या तक्रारींच्या आधारे नियामक संस्थांकडून विकासकांना नोटीस बजाविण्यातही वाढ झाली आहे. याचबरोबर जाचक नियमांमुळे अनेक प्रकल्प रखडले आहेत, असे मुद्दे क्रेडाई-पुणे मेट्रोने शुक्रवारी उपस्थित केले.

क्रेडाईच्या वतीने आयोजित पुणे प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्‌घाटन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी क्रेडाई-पुणे मेट्रोचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, उपाध्यक्ष अरविंद जैन व मनीष जैन, व्यवस्थापन समितीचे सदस्य जे. पी. श्रॉफ व पुनीत ओसवाल, पर्यावरण समितीचे सहअध्यक्ष मनीष कनेरिया आणि माध्यम विभागाचे कपिल गांधी आदी उपस्थित होते.

या वेळी शहरातील वाढते प्रदूषण आणि बांधकाम क्षेत्रावर अलीकडच्या काळात झालेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित झाला. राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरणाकडे पुण्यातील शंभरहून अधिक मोठे बांधकाम प्रकल्प अडकले आहेत. याचबरोबर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील अनेक विकासकांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर हा प्रकार वाढल्याचे निरीक्षण कनेरिया यांनी नोंदविले. विकासकांकडून नियमांचे पालन केले जात असून, काही कार्यकर्ते विकासकांना लक्ष्य करीत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. नियामक संस्थांकडून नोटीस मिळाल्यानंतर विकासक त्रुटी दूर करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी नाईकनवरे म्हणाले, की हवा प्रदूषणात वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा वाटा अधिक आहे. रस्त्यांवर सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होऊन प्रदूषण होत आहे. विकासकांसाठी महापालिकेची नियमावली आहे. या नियमावलीची अंमलबजावणी विकासकांकडून होते की नाही, याची तपासणी सातत्याने महापालिकेची पथके करतात. त्यामुळे विकासकांकडून प्रदूषण होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.

### वाहतूककोंडी कमी करणार

**या वेळी मुरलीधर मोहोळ म्हणाले, की पुण्यातील वाहतूककोंडी कमी करण्यावर आगामी काळात भर राहणार आहे. यासाठी नवीन रस्त्यांच्या बांधणीसोबत पायाभूत सुविधांच्या उभारणीला गती देण्यात येणार आहे. नवीन विमानतळाबाबतही पावले उचलण्यात येत आहेत. शहराचा विस्तार होत असल्याने पाण्याची गरज वाढत आहे. यामुळे १ हजार ८०० किलोमीटर लांबीच्या नवीन जलवाहिन्या बसविण्यात येणार आहेत.**

> **सरकारने गृहनिर्माण क्षेत्रावरील कर कमी केल्यास घरांच्या किमती कमी होऊन ग्राहकांना फायदा होईल. याचबरोबर ग्राहकांसाठी गृहकर्जावरील सवलतीची रक्कमही सरकारने वाढवावी. यातून परवडणाऱ्या घरांची विक्री वाढण्यास मदत होईल.**
> **- रणजित नाईकनवरे, अध्यक्ष, क्रेडाई-पुणे मेट्रो**



## सौ. प्रार्थना बुवा सन्मानित

### राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट ज्ञानदा इन्स्टिट्यूट तर्फे समाजात विविध क्षेत्रात राबणाऱ्या महिलांचा सन्मान शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी मराठवाडा मित्र मंडळ, डेक्कन जिमखाना पुणे येथे संपन्न झाला.

यावेळी पुष्पम ब्युटी पार्लरच्या संस्थापिका आणि मेकअप-हेअर आर्टिस्ट सौ. प्रार्थना बुवा यांचा राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मरिमाता मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा भारती अंकलेल्लू यांनी केले तर यावेळी ज्ञानदा इन्स्टिट्यूटचे संचालक जयंत कुलकर्णी हे देखील उपस्थित होते.

# युवराजचे अधिकारी होण्याचे स्वप्न भंगले

### नारायणगावातील अपघातानंतर पंचक्रोशीत शोककळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भरधाव टेम्पोने प्रवासी वाहतूक करणाऱ्या व्हॅनला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात नऊ जण ठार झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव परिसरात घडली. अपघातात आठ जण गंभीर जखमी झाले. अपघातात स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा कांदळी गावातील महाविद्यालयीन तरुण युवराज महादेव वाव्हळ (वय २३) याचा मृत्यू झाला. युवराजचे अधिकारी होण्याचे स्वप्न भंगल्याने परिसरातील ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली. अपघातात कांदळी गावातील शिक्षिका मनीषा नानासाहेब पाचारणे (वय ५६) यांचा मृत्यू झाला.

अपघातात विनोद केरभाऊ रोकडे (वय ५०), युवराज महादेव वाव्हळ (वय २३), चंद्रकांत कारभारी गुंजाळ (वय ५७), गीता बाबूराव गवारे (वय ४५), भाऊ रभाजी बढे (वय ६५), मनीषा नानासाहेब पाचारणे (वय ५६) यांच्यासह नऊ जणांचा मृत्यू झाला. कांदळी गावातील सहा जणांचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांना धक्का बसला. पंचक्रोशीत शोककळा पसरली. अपघातात देवूबाई दामू टाकळकर (वय ६५, रा. वैशाखखेडे, ता. जुन्नर), नजमा अहमद हनीफ शेख (वय ३५, रा. गड्डी मैदान, राजगुरुनगर, ता. खेड), वसीफा वासीम इनामदार (वय ५) यांचा मृत्यू झाला. शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे कांदळी, वैशाखखेडे गावातील रहिवासी कामानिमित्त बाहेर पडले होते.

आळे फाटा परिसरातून ते प्रवासी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमधून निघाले होते. युवराज वाव्हळ स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. त्याला अधिकारी व्हायचे होते. नेहमीप्रमाणे तो सकाळी घरातून बाहेर पडला. नारायणगावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या संस्थेत तो व्हॅनमधून निघाला होता. मनीषा पाचारणे नारायणगाव परिसरातील आनंदवाडीतील भागातील एका शाळेत त्या शिक्षिका होत्या. पाचारणे निवृत्तीच्या उंबरठ्यावर होत्या. त्यांचे पती निवृत्त शिक्षक आहेत. त्यांच्यामागे पती, दोन मुले असा परिवार आहे. शाळेत जात असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाचारणे यांचा अपघाती मृत्यू झाल्याची समजताच शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थांना धक्का बसला.

राजगुरुनगर भागातील रहिवासी नजमा शेख या पाच वर्षांच्या वसीफा हिच्यासह नारायणगाव परिसरातील नातेवाईकांकडे आल्या होत्या. तेथून परतत असताना अपघात झाला. अपघातात नजमा यांच्यासह वसीफाचा मृत्यू झाला.



दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.